MHNS130001882012

नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०१२
मनोहर गांगुर्डे वि. वसंत गांगुडे व इ.

## निशाणी क्रमांक १६४ वर आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे व २इ. सुमन लक्ष्मण गरुड** हे मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी दाखल केलेला आहे. त्यांचे प्रस्तुत अर्जातील कथनाप्रमाणे, सदर दावेतील **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे** हे दि.१३.०५.२०२० रोजी व **२इ. सुमन लक्ष्मण गरुड** ही दि. ११.०६.२०१० रोजी मयत झालेले असून अर्जात नमूद केलेले त्यांना वारस असलेने त्यांना याकामी समाविष्ट करुन त्या अनुषंगाने दावेत दुरुस्ती करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे असलेने त्याप्रमाणे मुळ दावेत दुरुस्तीस परवानगी मिळणेसाठी वादी यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१, १ब, २ब—३, क, ड, ६ यांचेतर्फे विधीज्ञ तसेच प्रतिवादी क्र.२ब(१), ते २ब(४) तर्फे विधिज्ञ व प्रतिवादी क्र.१ब/१, १अ/१ ते १अ/३ यांनी प्रस्तुत अर्ज मंजुर करणेस आपली हरकत नोंदवतांना असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज हा योग्य, कायदेशीर व बरोबर नसलेने तसेच अर्ज मुदतीत नसल्याने नामंजूर करणेची विनंती केली आहे. त्यांनी असे देखील कथन केली की प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचे मत झाल्यास र.रु.१०,०००/— खर्च वादीवर लादण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांचा अर्ज, त्यास प्रतिवादीतर्फे युक्तीवादादरम्यान घेतलेली हरकत, तसेच दोन्ही बाजूंचा युक्तीवाद उभय बाजुंचे वर नमुद कथने यांचा विचार करुन अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांनी सदर दावा हा दावा वाटपासाठी दाखल केलेला दिसून येतो. त्या अनुषंगाने या कामातील वादी व प्रतिवादी यांनी सादर केलेली तथ्यकथने व दावेचे स्वरुप याचा विचार करता ज्याअर्थी **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे व २इ. सुमन लक्ष्मण गरुड** यांचे मृत्युनंतर दावा उत्तरजीवी राहतो त्याअर्थी त्यांचे वारसांना याकामी दावेत समाविष्ट करणे आवश्यक दिसून येते. **प्रतिवादी क्र. १अ व २इ.** हे मयत झालेलेच नाहीत असे प्रतिवादी यांचे म्हणणे नाही. तसेच प्रस्तुत अर्जासोबत विलंबमाफी व अॅबेटमेंट सेटअसाईडचा दाखल केलेला

अर्ज यापूर्वीच मंजूर केलेला आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने वादी यांनी प्रार्थीत केलेली दावेतील दुरुस्ती मंजुर करणे योग्य व संयुक्तिक अशी दिसून येते. येणेप्रमाणे वरील सर्व कारणमिमांसेचा विचार केला असता, सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

**१)** अर्ज मंजुर करणेत येतो.

**२)** वादी यांनी अर्जात प्रार्थीत केलेपम्राणे दावेत **प्रतिवादी क्र. १अ अरविंद वसंत गांगुर्डे व २इ. सुमन लक्ष्मण गरुड** यांचे वारस समाविष्ट करुन दुरुस्त प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

**३)** प्रस्तुत अर्जाचा खर्च वादी यांचेवर ठेवणेत येत आहे.

**सही /—XXX**
**( व. वा. खेंदाड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पिंपळगाव(ब)

दिनांक :— ०२/०४/२०२६.
ठिकाण :— पिंपळगाव(ब)